**सहसंचालक तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय अमरावती**
**शासकीय तंत्र निकेतन परीसर, गाडगेनगर अमरावती**
Email:- roamravati@dtemaharashtra.gov.in Web:-http://www.jdroamt.org
Phone:- ०७२१-२५७३०२७, २५७२५७७ Fax No.-०७२१-२५६२८५३

**परिपत्रक /महत्वाचे**

क्र. विकाअ/लेखा/वृक्षलागवड/२०१८/ 1032
दि. 2 6 APR 2018

प्रति,

प्राचार्य
विभागातील सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित
अभियांत्रिकी/औ.नि.शास्त्र पदवि/पदविका संस्था

**विषय:-** सन २०१८ मधील १३ कोटी वृक्षलागवड कार्यक्रमाचे नियोजन, पुर्वतयारी, आव्हाने व उपाययोजना इत्यादी बाबत विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी हयांचे समवेत सचिव (वने ) यांचे अध्यक्षतेखाली आयोजीत बैठक.

**संदर्भ** १. मा.विभागीय आयुक्त यांचे पत्र क्र.विआअ/रोहयो/१३ कोटी/अ.का-४/कावि-२७३/२०१८ दि. २३ एप्रिल २०१८
२. मा.विभागीय आयुक्त यांचे कार्यालयात दि.२६.४.२०१८ रोजी आयोजीत बैठकीतील निर्देश.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, दि.१.७.२०१८ ते ३१.७.२०१८ या कालावधीत राज्यात किमान'१३ कोटी वृक्ष लागवड अभियान राबविण्याकरीता पुर्वतयारी चे अनुषंगाने विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी हयांचे समवेत सचिव (वने ) यांचे अध्यक्षतेखाली दि. ११.४.२०१८ रोजी नियोजन भवन जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे तसेच दि.२६.४.२०१८ रोजी विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजीत बैठकीमध्ये या कार्यालयाचे अधिनस्त येणा-या संस्थेस दिलेल्या वृक्ष लागवडीचे उदिष्टानुसार १००% खडडे खोदण्याचे काम दि. **३० एप्रिल २०१८** पुर्वी पूर्ण करण्याबाबत सक्त सुचना मा. विभागीय आयुक्त यांनी दिलेल्या आहेत. त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, १३ कोटी वृक्षलागवड मोहिमे अंतर्गत १ जूलै २०१८ रोजी करावयाचे वृक्षलागवडीकरीता खडडे खोदण्याचे काम दि.३०.४.२०१८ पूर्वी पूर्ण करुन त्या बाबतची माहिती संस्थेतील **Site Co-ordinator यांचे Login मधून Green Army Portal वर Uplod करण्यात यावी** व केलेल्या कार्यवाहीचा **अहवाल खडडयाचे फोटोसह दिनांक ५ मे २०१८ पुर्वी** या कार्यालयास इमेलव्दारे सादर करावा. तसेच संस्थेतील सर्व अधिकारी/कर्मचारी व विदयार्थी यांची Green Army Portal वर नोंदणी करणे अनिवार्य आहे. सदरहू कार्यवाही तात्काळ पूर्ण करण्याकरीता संस्था स्तरावर कॅम्प आयोजीत करुन संस्थेतील अधिकारी/कर्मचारी/विदयार्थी यांची हरीत सेनेमध्ये १०० % नोंदणी पूर्ण करण्यात यावी. संस्थेतील किती अधिकारी/कर्मचारी/ विदयार्थी यांची नोदणी पूर्ण करण्यात आलेली आहे त्या बाबतचा अहवाल इमेलव्दारे या कार्यालयास सादर करावा.

उपरोक्त माहिती मा. वनमंत्री, महाराष्ट्र शासन यांचे आयोजीत बैठकीस सादर करावयाची आहे.

(डॉ. डी.व्ही.जाधव )
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
अमरावती

**प्रतिलिपी:-**१) मा. संचालक तंत्र शिक्षण, म.रा.मुंबई यांना माहिती करीता सादर.
२) प्रोग्रामर, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती यांना आवश्यक कार्यवाहीकरीता